**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २८७०१२०/२१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotimjprf@gmail.com

जावक क्र. महाज्योती/पीएचडी विभाग/२०२६-२७/ ७९८ दि.२३/०४/२०२६

# परिपत्रक

**विषय : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०२१, २०२२ व २०२३ अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून अंतिम कागदपत्रे सादर करण्याबाबत.**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०२१, २०२२ व २०२३ अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांचे संशोधन केंद्र ज्या विभागात स्थित आहे त्या विभागातील प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या कार्यालयात संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या.

त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांची पीएचडी पूर्णत्वास येत आहे अशा विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या mahajyotimjprf@gmail.com या ई-मेलवर तसेच हेल्पडेस्क क्रमांक ०७१२-२८७०१२० / १२१ वर संपर्क साधून पूर्वसूचना द्यावी. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना महाज्योती कार्यालय, नागपूर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येईल.

प्रत्यक्ष उपस्थित राहतेवेळी विद्यार्थ्यांनी त्यांचा अंतिम प्रगती अहवाल, लघु शोध प्रबंध (थेसिस), नोटिफिकेशन, डिग्री/ प्रोव्हिजनल डिग्री इत्यादी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

स्वा

**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**